**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ७१ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - २२८** **दिनांक - ०२/१२/२०२५**

**विभाग — आरोग्य विभाग**

---

**प्रस्तावाचा-** विलगीकरण कक्षातील कपडे धुलाईचे देयक अदा करणेबाबत.

- -**--

**ठराव** — विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, आरोग्य विभाग अंतर्गत कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखणेकामी अहिल्यानगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विलगीकरण कक्ष अधिग्रहित केलेले होते. सदर विलगीकरण कक्षामध्ये बेडशीट चादर उशीचे कव्हर दवाखान्याच्या वार्षिक निविदाकार यांचे मार्फत धुवुन देणेबाबत मा. आयुक्त यांनी जा.क्र.सा.प्र.वि./पीए-३३४ दि.२१/७२०२० ने आदेशित केलेले होते. सदर कामाचे देयक हे कोविड-१९ या लेखाशिर्षकामधुन करावयाचे आहे.सदर देयकास १ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने मा. महासभेची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

तरी मे. अजंता क्लिनर्स यांचे देयक रू. १,८४,५१४/- ( रू. एक लाख चौ-याऐंशी हजार पाचशे चौदा फक्त ) अदा करणेस मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

( सही )
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

( सही )
( यशवंत डांगे )
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ७१ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - २२९** **दिनांक - ०२/१२/२०२५**

**विभाग –नगररचना विभाग**

---

**प्रस्तावाचा-** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान ( जिल्हास्तर ) योजना सन २०२५-२०२६ प्रस्तावित कामासाठी निधी मंजुर करणे बाबत.

- -**--

**ठराव** – विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान ( जिल्हास्तर ) योजना सन २०२५२०२६ साठी रक्कम रूपये १३,८२,६५५-५५ इतका निधी आवश्यक आहे. सदर योजनेतून खाली नमूद काम प्रस्तवित करणेत येत आहे. सदर कामाची रक्कम जिल्हाधिकारी यांचे मार्फत निश्चीत करणेत आलेली आहे. सदर काम हे इतर कोणत्याही योजनेतून मंजूर वा प्रस्तावित करण्यात आलेले नाही.

सदर योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार ३० टक्के मनपा हिश्याची रक्कम महानगरपालिके कडे नाही. याबाबत वर नमूद केलेली संपुर्ण रक्कम प्रशासकीय औपचारीकता पुर्ण करणेच्या दृष्टिने सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी नगरपालिका शाखा यांना सादर करावा लागणार आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | मागणी केलेली रक्कम |
|---|---|---|
| १ | मौजे केडगाव ता.जि अहिल्यानगर येथील भुसंपादन प्रस्ताव क्र. ५३८/७० मध्ये सिव्हील रिट पिटीशन नं. ५७०२/२०११ स्पेशल दरखास्त नं.२०६/९८,२०७/९८विरुध्द हसनअली वली मोहम्मद मयत वारस गुलजार अली प्रकरणी अनुज्ञेयता तपासून मावेजा अदा करणे कामी कार्यवाही करणे बाबत शासन निर्णय दिनांक १६ मे २०१६ मधील तरतुदीनुसार प्रस्ताव सादर करणेच्या सूचना देणेत आलेल्या आहेत.<br>मौजे केडगाव येथील जमीन ४२१/१ म्हणजे विस्तारीत नविन गावठाण होय त्यामध्ये जिल्हाधिकारी यांनी शासकीय अधिकारी/कर्मचारी व इतर नागरी यांना सदर जागेत प्लॉट पाडून रहाणेसाठी जागा उपलब्ध करुन दिलेली आहे प्रश्नार्थी जागा ही महाराष्ट्र शासनाची आहे. सदर जागेचे मूळ मालक हसनअली वली मोहम्मद मयत वारस गुलजार अली यांची गट क्रमांक ४२१/१ एकूण ६ एकर २७ आर ही जागा विस्तारीत गावठाणसाठी शासनाने म्हणजेच तत्कालीन विशेष भूसंपादन अधिकारी घोड प्रकल्प क्रमांक १ अहमदनगर यांनी एलएक्युएसआर/५३८ दिनांक २९/९/१९७० चे निवाडया प्रमाणे एकूण १४ हे. ०९ आर एवढी जमीन संपादन केलेचे दिसून येते. संदर जमीन संपादना नंतर अपीलार्थी म्हणजेच जमीनीचे मुळ मालक हसनअली वली मोहम्मद मयत वारस गुलजार अली यांना सदर जमीनीचा मावेजा संपादन संस्थेने म्हणजेच तत्कालीन विशेष भूसंपादन अधिकारी यांनी दिलेचे देखील दिसून येते.<br>तदनंतर सदर जमीनीचे मूळ मालक यांना निवाड्या नुसार वाढीव मोबदला रक्कम रुपये १० लाख मिळालेचे दिसून येते. असे विशेष | **१६,५५,६५५-५५** |

| | | |
|---|---|---|
| | भूसंपादन अधकारी यांनी अहमदनगर येथील न्यायालयात दिलेल्या प्रतिज्ञापत्रात नमूद केलेचे दिसून येते याबाबत जमीन मालक यांनी मा.न्यायालात मिळालेल्या संपादनाचे रकमेवर व्याज मिळणे बाबत दावा दाखल करुन असून सदर दाव्यात वाढीव रक्क्म मिळणे बाबत नमूद केलेले आहे. त्यानुशंगाने वरील संदर्भीय<br>पत्रान्वये उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्रमांक १ यांनी निश्चीत केलेली रक्क्म जिल्हाधिकारी यांची नगरपालिका शाखा यांचे कडील पत्रात रक्कम रुपये 13,82,655-55 एवढी मागणी करणे बाबत नमूद करुन सदर रकमेची मागणी व त्यास प्रशासकीय मान्यता देणे कामी प्रस्ताव पाठविणे बाबत आदेशीत केलेले आहे.<br>परंतु दिनांक १६ मे २०१६ चे शासन निर्णयातील मुद्या क्रमांक १ ते ८ मध्ये या मागणीचा प्रस्ताव बसत नसलेने केवळ प्रशासकीय औपचारीकता पुर्ण करणेचे दृष्टिने १०० टक्के रक्कम म्हणजे रुपये- **१३,८२,६५५-५५ अक्षरी रुपये तेरा लाख ब्याऐंशी हजार सहाशे पंचावन्न पैसे पंचावन्न मात्र** रकमेची मागणी जिल्हाधिकारी यांच कडेस करावी लागणार आहे | |

उक्त नमूद कामाचा प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महा अभियान ( जिल्हास्तर ) सन २०२५ — २०२६ अंतर्गत रक्कम रूपये १३,८२,६५५-५५ अक्षरी रूपये तेरा लाख ब्याऐंशी हजार सहाशे पंचावन्न पैसे पंचावन्न मात्र खर्चाचा प्रस्तावास व मा. जिल्हाधिकारी अहिल्यानगर नगरपालिका शाखा यांचे कडेस पाठविण्यास मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| ( सही ) | ( सही ) |
| ( मेहेर लहारे ) | ( यशवंत डांगे ) |
| प्र. नगरसचिव | प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपालिका | अहिल्यानगर महानगरपालिका |

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ७१ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - २३०** **दिनांक - ०२/१२/२०२५**

**विभाग — आरोग्य विभाग**

---

**प्रस्तावाचा-** मा. सर्वोच्च न्यायालयाच्या suo moto writ petition civil No s 5 of 2025 व प्राणी जन्म नियंत्रण ABC नियम २०२३ मधील तरतुदींचें काटेकोरपणे अनुपालन करणे बाबत

- -**--

**ठराव** — विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, मनपा हद्दीतील भटके श्वानांबाबत न्यायालयाच्या निर्देशानुसार व प्राणी जन्म नियंत्रण (ABC) नियम, २०२३ मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणे कामी वरील संदर्भाने मार्गदशक सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्या अनुशंगाने शासन परिपत्रकानुसार महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायती क्षेत्रातील भटक्या श्वानांकरिता खाण्यासाठी जागा निश्चित करण्यात याव्यात व त्याच जागेवर भटक्या श्वानांना खायला देण्यात येत आहे याची खातर जमा करावी इतर मोकळ्या ठिकाणी खायला देणा-या विरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात यावी. असे निर्देश दिलेले आहेत. भटक्या श्वानांना खायला देण्यासाठी जागा निश्चित करण्याची कार्यवाही विभागामार्फत सुरु आहे. मात्र मोकळ्या ठिकाणी कुत्र्यांना खायला देणा-या विरुध्द दंडात्मक कारवाईची रक्कम अद्याप पावेतो निश्चित केलेली नाही. सबब सदर बाबीकरिता दंडाची रक्कम निश्चित करणे आवश्यक आहे.

याकरीता घनकचरा विभागाकडील पारीत ठरावानुसार अ.क्र. ४ उघड्यावर कचरा टाकणे दंडाची रक्कम रु.३००/- (रु. तीनशे फक्त) या धरतीवर मोकळ्या ठिकाणी कुत्र्यांना खायला देणा-या विरुध्द दंडात्मक कारवाईची रक्कम रु.३००/- (रू. तीनशे फक्त) प्रत्येक वेळी दंड निश्चित करणे उचीत वाटते. तसेच सदर दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार व जबाबदारी घनकचरा व्यवस्थापन विभागा अंतर्गत कार्यरत स्वच्छता निरीक्षक / त्यांच्या अखत्यारीतील कार्याक्षेत्र कर्मचारी यांना देणे उचीत वाटते. कारण कोंडवाडा विभागाकडे या कामासाठी कर्मचारी उपलब्ध नाहीत. तसेच ही बाब सार्वजनिक परिसर अस्वच्छ करणे या मध्ये समाविष्ट असणार आहे. तथापि कोंडवाडा विभागाकडुन श्वानांच्या खाण्याच्या सार्वजनिक जागा (फिडींग स्पॉट) यांची माहीती वेळोवेळी घनकचरा विभागाकडे देण्यात येईल.

तरी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या SUO MOTO WRIT PETITION (Civil) NO(s) of 2025 व प्राणी जन्म नियंत्रण (ABC) नियम, २०२३ मधील तरतुदींचे काटेकोरपणे अनुपालन करणे कामी मोकळ्या ठिकाणी कुत्र्यांना खायला देणा-या विरुध्द दंडात्मक कारवाईची रक्कम रु.३००/- (रू. तीनशे फक्त) दंड आकारणी करणेस मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

( सही )
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

( सही )
( यशवंत डांगे )
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका